पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०९/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०९/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकीता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आवारी - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.डॉ.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) महिला बालकल्याण समिती सदस्यांसाठी अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत – मा.योगीता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) सभा आयोजनाबाबत – मा.योगीता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१६/०८/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०६/०९/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/२१६/२०१७, दि.३०/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिलांना चार चाकी हलके वाहन ( L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (T.R) प्रशिक्षण देणे ही योजना सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या अटी/शर्तीनुसार वस्तीपातळीवर राबविणेस तसेच या योजनेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी महिलांना चार चाकी हलके वाहन ( L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (T.R) प्रशिक्षण देणेबाबत प्रपत्र अ मधील अट क्र.०७ मध्ये उत्पन्नाची अट र.रु.१,००,०००/- ऐवजी र.रु.२,००,०००/- करून त्यानुसार प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०६/०९/२०१७ विभाग – नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा.सागर आंगोळकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/२१७/२०१७, दि.३१/०८/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजने अंतर्गत इ.८ वी ते १२ वी मध्ये शिकत असणा-या मुलींना मोफत सायकल वाटप व महिलांना मोफत शिलाई मशीन वाटप या दोन योजना कार्यान्वयीत आहेत. तथापि शासन निर्णय क्रमांक : डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/

का.१४१७ दि.०५/१२/२०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांनी कल्याणकारी योजनांतर्गत साहित्या ऐवजी रोख स्वरुपात शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार लाभ देण्यात यावा असे नमुद केलेले आहे. त्या अनुषंगाने या दोन योजनांमध्ये दुरुस्ती करणे तसेच पाळणाघरांना अर्थसहाय्य देणे या योजनेत संस्था नोंदणी कालावधी तीन वर्षांऐवजी दीड वर्षे करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रपत्र "अ" "ब" "क" नुसार या योजनांमधील दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०६/०९/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी महाबळेश्वर येथे महिला बचत गटांनी सुरु केलेले उद्योग व्यवसाय पाहण्यासाठी अभ्यास दौरा आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०६/०९/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पुढील सभा दिनांक २०/०९/२०१७ रोजी येत आहे. परंतु सदर दिवशी मा.महापालिका सभा असलेने मा.महिला व बालकल्याण समितीची सभा मंगळवार दिनांक १९/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११०१/२०१७
दिनांक : ०६/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018**
**महिला व बाल कल्याण योजना**
**प्रपत्र अ ( ठराव क्रमांक १५ दि.०६/०९/२०१७ चे लगत)**

**महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांना चार चाकी हलके वाहन ( L.M.V.) चालविण्याचे ( मोटार ड्रायव्हिंग ) ( T.R.) प्रशिक्षण देणेबाबत.**

**<u>महिला लाभार्थ्यांसाठी पात्रता निकष (अटी व शर्ती)</u>**

१. महिला / मुलीच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढले बद्दलची पोच पावती ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक.

२. पिं.चिं.म.न.पा.हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक.

३. वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे / नाव असलेले:- आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती / घरपट्टी ( मिळकतकर ) पावती / पिं.चिं.म.न.पा.कडिल झोपडपट्टीधारक म्हणुन ओळखपत्र / मतदार ओळखपत्र / विद्युत बिल / टेलिफोन बील/ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक / रेशनकार्ड. यापैकी कोणताही एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.

४. वय वर्ष २० पूर्ण असणे आवश्यक पुराव्यार्थ जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. प्रमाणपत्र, इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

५. इयत्ता ८ वी पास असणे आवश्यक. पुराव्यार्थ शैक्षणिक अर्हते संबधितचा दाखला (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

६. एकुण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी रक्कम सहभाग शुल्क म्हणुन आगाऊ भरणे आवश्यक.

७. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक उत्पनाचे पुराव्यार्थ मा.तहसिलदार / तत्सम अधिका-यांकडील उत्पन्नाचा दाखला. / पिवळे व केशरी रेशनकार्डवरील रक्कम रुपये १,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न (साक्षांकित सत्यप्रत.) आवश्यक.

८. शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी २ व पक्की अनुज्ञप्तीसाठी २ असे नजिकच्या कालावधीत काढलेले एकुण ४ फोटो (पासपोर्ट साईज) आवश्यक.

९. याव्यतिरिक्त परिवहन कार्यालयाच्या मागणीनुसार आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित सत्यप्रत. सादर करणे बंधनकारक राहील.

१०. नाव बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय राजपत्र, रक्कम रुपये १००/- चे स्टँम्प पेपर वरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक.

सही/-
**आयुक्त.**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी-१८**